महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत उमेद कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांच्या मागण्यांबाबत अभ्यास समितीचे पुनर्गठन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२४/योजना-३**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
दिनांक: ०३ ऑगस्ट,२०२६

**वाचा :**

१) ग्रामविकास विभागाचा,शासन आदेश, क्रमांक: MSRLM-२०२४/प्र.क्र.८४/ योजना-३, दिनांक १५.१०.२०२४.
२) राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक १४.१०.२०२४ रोजी सह्याद्री अतिथी गृह, मुंबई येथे झालेल्या बैठकीतील निर्देश.
३) मा. मंत्री महोदय, ग्रामविकस व पंचायत राज, महारष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक दिनांक १४.०५.२०२५.
४) मा. मंत्री महोदय, ग्रामविकस व पंचायत राज, महारष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक दिनांक १०.१२.२०२५ व ११.१२.२०२५.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांचे दिनांक ०९.०२.२०२६ रोजीचे पत्र.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई यांचे दिनांक १७.०३.२०२६ रोजीचे पत्र.

## शासन निर्णय :

उपरोक्त वाचा क्र.१ येथील दिनांक १५.१०.२०२४ रोजीचे शासन आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२. उमेद संघटनेच्या कर्मचाऱ्यांना राज्याच्या इतर विभागाच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय सेवेत सामावून घेणे, उमेद अभियानाला स्वतंत्र विभाग म्हणून मान्यता देणे, उमेद कॅडरमधील महिलांना सेवेची हमी देणे व उमेद कर्मचाऱ्यांची पदोन्नती आणि बदल्या इत्यादी मागण्याबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापित समितीचे पुढीलप्रमाणे पुनर्गठन करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | समिती मधील पद |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य व्यवस्थापन कक्ष, बेलापूर,नवी मुंबई. | अध्यक्ष |
| २ | मा.श्री. मनोज विजय रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पालघर. | सदस्य |

| अ. क्र. | नाव व पदनाम | समिती मधील पद |
|---|---|---|
| ३ | मा.सह सचिव (कें.यो.),ग्राम विकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ४ | मा. अतिरिक्त संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य व्यवस्थापन कक्ष, बेलापूर,नवी मुंबई. | सदस्य |
| ५ | मा. श्री अशोक मरिबा सिरसे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि. यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर. | सदस्य |
| ६ | मा. उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य व्यवस्थापन कक्ष, बेलापूर,नवी मुंबई. | सदस्य |
| ७ | श्री. प्रभाकर गावडे, मार्गदर्शक, उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना | निमंत्रित |
| ८ | श्री. नवनाथ पवार, मार्गदर्शक, उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना | निमंत्रित |
| ९ | श्रीम. मालुताई देशमुख, अध्यक्ष (राज्य महिला कार्यकारणी), उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना | निमंत्रित |
| १० | श्री. रुपेश मर्चंडे, उपाअध्यक्ष, उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना | निमंत्रित |
| ११ | श्रीम. चित्रांगी म्हात्रे, सदस्य, उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटना. | निमंत्रित |
| १२ | मा. अवर सचिव, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य व्यवस्थापन कक्ष, बेलापूर,नवी मुंबई. | सदस्य सचिव |

३. वरीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या समितीने राज्यामध्ये कार्यरत असलेली उमेद- महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेच्या मागण्यांबाबत अभ्यास करून अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०३१२३४२६२८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

VIVEK ASHOK DAINGADE

Digitally signed by VIVEK ASHOK DAINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=53c2fccec74ddb1c052589e5cbaed9d19ba0d0043df169c83be27faeb8bf045b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=670EB0FA576F65F4406D031E11A90EA6FFB3AEFB253D401F5CED2AD1A6605DBF, cn=VIVEK ASHOK DAINGADE
Date: 2026.08.03 14:20:49 +05'30'

**(विवेक दाईंगडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य व्यवस्थापन कक्ष, बेलापूर, नवी मुंबई.
२. सर्व समिती सदस्य.
३. निवड नस्ती (योजना-३).